14-04-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 04/13/2025 10:22 PM Page 1



# मये भागात मिरची लागवड संकटात

## विशिष्ट प्रकारचा रोगामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

■ टीम दैनिक हेराल्ड





**डिचोली, दि. १३ :** दरवर्षी पोरसु लागवडीतून मिरची भाजीपाला वाल, कांदा लागवड करतात. आपल्या वर्षभराचा पुरमेत करून मिरची व इतर भाजीपाला विकून चांगला नफा करणाऱ्या या भागातील अनेक शेतकऱ्यांना यावर्षी मिरचीला विशिष्ट प्रकारचा फंगस लागल्याने तसेच भेंडी, कांदा व इतर पिकांवरही विशिष्ट प्रादुर्भाव झाला आहे. सुमारे ६०% नुकसान सोसावे लागणार आहे. त्यामुळे शेतकरी हवालदील झाले आहेत.

प्रगतिशील शेतकरी विश्वास चोडणकर यांच्या पोरसु लागवडीत मिरचीला पिकल्यानंतर फंगस धरत आहे, त्यामुळे ५० टक्क याहून अधिक मिरचीचे पीक धोक्यात आलेले आहे, त्याचबरोबर गावठी भेंडी तसेच इतर भाजीपाल्याला फंगसचा प्रादुर्भाव झाल्याने नुकसान होत असल्याचे विश्वास चोडणकर यांनी सांगितले.

या संदर्भात शेतकऱ्यांनी कृषी खात्याशी संपर्क साधल्यानंतर कृषी अधिकारी नीलिमा गावस तसेच श्री. जोग व इतर अधिकाऱ्यानि तातडीने या ठिकाणी भेट देऊन या ठिकाणी मिरची लागवड व इतर लागवड याची तपासणी केली याबाबत एका विशिष्ट प्रकारचा फंगसची लागवड झाल्याचे आढळून आले. वरिष्ठ अधिकाऱ्यांची चर्चा करून याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याची माहितीदेण्यात आली.

तालुक्यात बऱ्याच ठिकाणी अनेक कष्टकरी शेतकरी परसू लागवडीतून मिरची व इतर लागवड करून पुरुमेत करतात व विक्री मोठ्या प्रमाणात करतात. त्यामुळे त्यांना चांगला नफाही प्राप्त होत असल्याचे विश्वास चोडणकर यांनी सांगितले. मात्र यंदा मिरची लागवडीवर संक्रांत आल्याने तयार झालेली मिरची पांढरी पडत असल्याचे आढळून आल्याने ५० ते ६० टक्के नुकसान सोसावे लागणार असल्याचे येथील शेतकरी बांधवांनी सांगितले.

गेली साठ वर्षे आम्ही या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पोरस लागवड करून मिरची, कांदा, वाल व इतर पिके घेत आहोत. पूर्वीची परिस्थिती बिकट होती, लाटेने पाणी काढावे लागत, असे मात्र गेल्या काही वर्षात आम्ही सरकारी योजनांच्या माध्यमातून स्प्रिंकलर्स बसवल्याने काही प्रमाणात काम सोपे झालेले आहे. मात्र, गेल्या चार–पाच वर्षात गावठी कांद्याचे पीक घेणे कठीण झाले असून रोग आल्याने बियाणे नष्ट झाल्याचे सांगण्यात आले. यावर्षी मिरची पीक खूप चांगले आलेले आहे. मात्र, त्याचा फंगस लागल्याने मिरची पांढरी पडत असल्याने ५०% होऊन अधिक नुकसान सोसावे लागत असल्याचे कमलावती चोडणकर या ज्येष्ठ शेतकरी महिला सांगितले.

कृषी खात्याने यासंदर्भात पाहणी करून आपला अहवाल घेतला असून वरिष्ठ अधिकाऱ्यांची चर्चा करून पुढील निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी मिरची व इतर लागवडील मोठ्या प्रमाणात नुकसान होणार असल्याने नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी येथील शेतकरी बांधवांनी केली आहे

विश्वास तोडणकर हे गेली अनेक वर्षे परसू लागवडीतून मिरची कांदा वाल भाजीपाला या माध्यमातून मोठ्या प्रमाणात विक्री करून आपला चांगला निर्वाह करतात एक प्रगतिशील शेतकरी म्हणूनही त्यांना सरकारने पुरस्कार देऊन गौरवही केलेला आहे त्याचप्रमाणे अनेक शेतकरी या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे पोरसु लागवड करून वर्षभराची पुरुमेत ची तयारी करत असतात व विक्री ही करतात मात्र या वर्षी त्यांना मोठा फटका बसल्याने त्यांना मदत पुरवावी अशी मागणी होत आहे.

पान १ वरून

### चर्चिल ब्रदर्सने सुपर कपमधून घेतली माघार

समितीकडून लवकरच निर्णय येण्याची शक्यता असून, तो संपूर्ण स्पर्धेच्या निकालावर परिणाम करू शकतो.आय–लीगच्या इतिहासात प्रथमच अधिकृत विजेता न जाहीर करता हंगाम संपला आहे. आयएसएल पदोन्नतीही याच निर्णयावर अवलंबून असून, त्यामुळे चर्चिल ब्रदर्स व इतर संबंधित क्लबमध्ये मोठी अस्वस्थता आहे.

-------------

### जिल्हा अग्निसुरक्षा कृती आराखड्याची गोवाकॅनची मागणी

ट्रॅव्हल अँड टुरिझम असोसिएशन ऑफ गोवा, गोवा स्टेट इंडस्ट्रीज असोसिएशन, गोवा इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, कदंब ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशन लिमिटेड, बस ओनर्स असोसिएशन, एलपीजी आणि पेट्रोलियम डीलर्स असोसिएशन, व्यापारी संघटना, बँका, गृहनिर्माण संस्था, ग्राहक मंच, स्वयंसहायता गट आदी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी होऊ शकतील. तसेच डीएफईएसने विविध शासकीय विभागांच्या सहकार्याने जनजागृतीसाठी अग्निसुरक्षा संवेदनशीलता कार्यक्रम आयोजित करावेत, असेही गोवाकॅन ने सुचवले आहे.

गोवाकॅन ने हे पत्र मुख्य सचिव, महसूल आणि ग्राहक व्यवहार सचिव, संबंधित जिल्हाधिकारी, गोवा पोलिस महासंचालक, गोवा आयडीसी चे व्यवस्थापकीय संचालक, शहरी विकास संचालक तसेच कृषी, आरोग्य, पर्यटन, उद्योग, व्यापार, वाहतूक व नागरी पुरवठा विभागांना पाठवले असून या विषयावर तातडीने कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.

---------------

### हरमल ग्रामसभेत सचिवांच्या कार्यशैलीवर संताप

प्रभागात दोन कर्मचार्यांना नियुक्त करणार असल्याचे सांगितले. यावेळी राज्य सरकारच्या नवीन निर्णयाचा विचारही झाला, ज्याअंतर्गत बेकायदेशीर बांधकामांना नियमीत करण्याच्या प्रक्रियेचे स्वागत करण्यात आले. माजी पंच इनासीयों डिसोझा यांनी या निर्णयाचा फायदा ग्रामस्थांना कळविण्याची आवश्यकता व्यक्त केली. बैठकीला उपसरपंच सोनाली माझ्रि, संतान फर्नांडीस, दिव्या गडेकर, गुणाजी ठाकूर, भिकाजी नाईक आणि गटविकास निरीक्षक जिया मांद्रेकर उपस्थित होते.ॉ

# अखिल गोमंतक क्षत्रिय मराठा समाज संघटनेतर्फे गोवा पातळीवर कथाकथन, कविता वाचन स्पर्धा

▶ शिवाजी महाराजांचा इतिहास व जीवन मूल्यांची शिकवण घरोघरी पोहचवण्याचा संकल्प

■ टीम दैनिक हेराल्ड



**मडगाव : पत्रकार परिषदेत माहिती देताना विजयकुमार देसाई बाजूला गौरख फळदेसाई, रोहन देसाई व इच्छित फळदेसाई.**

**मडगाव, दि. १३ :** अखिल गोमंतक क्षत्रिय मराठा समाज संघटनेने छत्रपती शिवाजी महाराजावर अखिल गोवा पातळीवर कथाकथन व कविता वाचन स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती समाज संघटनेच्या शिक्षण विभागाने पत्रकार परिषदेत बोलताना दिली. यावेळी पत्रकार परिषदेला समाज संघटनेचे उपाध्यक्ष विजयकुमार कोप्रे , सदस्य इच्छित फळ देसाई, युवा अध्यक्ष गौरख फळ देसाई व स्पर्धा संयोजक रोहन देसाई उपस्थित होते.छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन कार्य, त्यांचा दैदिपमान इतिहास, छत्रपतींचे शौर्य, पराक्रम व गुण तसेच छत्रपतींचे गोमंतकाला दिलेले योगदान याचा परिचय विद्यार्थ्यांना व युवा पिढीला करून देण्यासाठी खास स्पर्धा आयोजित करण्यात येत असल्याची माहिती विजयकुमार देसाई यांनी दिली.

स्पर्धा अखिल गोवा पातळीवर घेण्यात येणार असून ही स्पर्धा सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांसाठी खुली असल्याची माहिती स्पर्धेचे संयोजक रोहन देसाई यांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराजावर आधारित कथाकथन स्पर्धा रविवार दि.११ मे रोजी घेण्यात येणार आहे. ही स्पर्धा पाचवी ते आठवी पर्यंत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी खुली आहे. स्पर्धेत स्पर्धकांना छत्रपतीवर मराठी, कोकणी,हिंदी किंवा इंग्रजी भाषेत कथा सादर करण्याची मोकळीक आहे. कथाकथनासाठी सात मिनिटांचा अवधी दिला जाणार आहे. स्पर्धा रविवार दिनांक ११ मे रोजी सकाळी ९ वाजल्या पासून सरकारी माध्यमिक विद्यालय बाळ्ळी सभागृहात घेण्यात येणार आहे. प्रथम येणाऱ्या स्पर्धकाला खास स्मृतीचिन्ह व रोख पारितोषिक तसेच दुसऱ्या व तिसऱ्या स्थानी येणाऱ्या स्पर्धांना खास रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येणार आहेत. त्याशिवाय चार उत्तेजनार्थ बक्षीसे देण्यात येणार आहेत. गोव्यातील कोणत्याही विद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली आहे.कथाकथन स्पर्धेबरोबरच अखिल गोवा खुली कविता स्पर्धेचे आयोजन ही करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित स्वतः लिहिलेली कविता सादर करण्याची संधी शिवप्रेमीना मिळणार आहे. ही स्पर्धा सर्वां साठी खुली आहे. कोकणी, मराठी, हिंदी किंवा मराठी कविता लिहून ती आयोजकांकडे पाठवावी लागणार असून निवडक कवींना स्पर्धेत कविता सादर करण्याची संधी मिळणार आहे.ज्यांना कथाकथन व कविता स्पर्धेत भाग घ्यायचा असेल त्यांनी अधिक माहिती साठी गोरख फळ देसाई ९५२७७१२६३८ किंवा रोहन देसाई ९५४५८१८९९५ यांच्याशी संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.



**हरमल : श्री नारायण देव महिला मंडळांच्या दिंडी कार्यक्रमातील महिला व बाल कलाकार.**

# हरमल श्री नारायण देव मंदिरात महिला मंडळाची दिंडी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. १३ :** खालचावाडा येथील श्री नारायण देव मंदिरात श्री हनुमान जयंती निम्मित दीपोत्सव व दिंडी कार्यक्रम श्री नारायण देव महिला मंडळाने उत्साहात साजरा केला.

या उत्सवात देवस्थान समितीचे अध्यक्ष राजेश व रीशा राजेश गोकर्णकर दांपत्याने श्री पूजा, अभिषेक केला.पहाटे श्री हनुमान पाळणा विधी व दुपारी महाप्रसाद झाला. यावेळी श्री नारायण देव महिला मंडळाने दिंडी कार्यक्रम आयोजित केला.ह्यावेळी बाल कलाकार दिव्यांशी राजेश गोकर्णकर,रोनिशा योगेश गोकर्णकर,ऊर्वी उध्दव गोकर्णकर व नीरजा नागेश गोकर्णकर यांनी नृत्य करून उत्सवाचा आनंद लुटला.ह्या उत्सवाच्या यशस्वीतेसाठी पदाधिकारी राजेश गोकर्णकर,शिशिर,नागेश गोकर्णकर, बाबलो उग्वेकर,संतोष तांडेल,हेमंत बांदेकर,प्रशांत पेडणेकर, सोनेष तांडेल आदींनी सहकार्य केले.शेवटी महिला मंडळाच्या अध्यक्ष अर्चना खोर्जे यांनी आभार मानले.




**साखळी : पहाटे सादर करण्यात आलेला चैत्रोत्सवाचे खास आकर्षण असलेला वीरभद्र.**

# साखळीत विरभद्र मिरवणूक उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १३ :** विठ्ठलापूर साखळीतील चैत्रोत्सवात पारंपरिक वीरभद्र मोठ्या उत्साहात करण्यात आला. भुपराजचा गजर करताना टाळ व मृदंगाच्या ठेक्यावर हातात तलवारी घेऊन नृत्य करणाऱ्या वीरभद्राला पाहण्यासाठी श्री विठ्ठल रखुमाई मंदिराच्या डाव्या बाजूने खास मंडपात लोकांची मोठ्या संख्येने गर्दी उसळली होती.

साखळीतील चैत्रोत्सवात अखेरच्या रात्रीनंतर पहाटे साजरा होणारा वीरभद्र हे या उत्सवाचे प्रमुख आकर्षण असते. चैत्रोत्सवाच्या अखेरच्या रात्री दशावतारी नाट्यप्रयोग संपल्यानंतर काही वेळाने खास आकर्षक वीरभद्र विठ्ठल रखुमाई मंदिराजवळ दाखल झाला. मारूती मंदिराजवळ त्याच्या पाठीला भद्र म्हणजेच प्रभावळ बांधण्यात आली. तेथे ठेवण्यात आलेल्या बाकांवर उभे राहून त्याने सर्वांना अभिवादन केले. तसेच देवाला नमस्कार केला. त्यानंतर त्याच्या हातात तलवारी देण्यात आल्या आणि समोर रचण्यात आलेल्या गवताच्या वर्तुळाला आग लावण्यात आली. बाकावर तलवारी नाचवत वीरभद्राने खाली उडी घेतली. व पेटत्या गवताला नाचतच फेरी मारली. आणि थेट तो मंडपात दाखल झाला.

मंडपात फेरे मरल्यानंतर त्याच्यावर दैवी संचार आला आणि त्याला सभोवताली असलेल्या साथीदाऱ्यांनी उचलून घेतले. त्याच्या हातातील तलवारी वेगळ्या करण्यात आल्या. तसेच पाठीमागे बांधलेली प्रभावळ वेगळी करण्यात आली. आणि त्याला उचलून विठ्ठल मंदिरात नेण्यात आले. मंदिरात देवाचे तीर्थ ग्रहण करायला देऊन तसेच अंगावर तीर्थ शिंपडल्यानंतर त्याचा अवसर निवळला.

वीरभद्र सोहळा झाल्यानंतर सकाळी विठ्ठल रखुमाई व सत्यभामाची मूर्ती रथात बसवून मंदिराभोवती मिरवणूक काढण्यात आली. या रथ मिरवणुकीनंतर या चैत्रोत्सवाची सांगता झाली.

# सासष्टीतील राय येथे दारूच्या नशेत कामगाराचा खून

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १३ :** सासष्टी तालुक्यातील सोनारवाडा–सांतेमळ, राय येथे दारूच्या नशेत झालेल्या वादातून एका कामगाराचा खून करण्याची घटना घडली. खगेश्वर साबा (४० वर्षे) खून करण्यात आलेल्या कामगाराचे नाव आहे. त्याच्या सोबत भाड्याच्या खोलीत राहणारे कामगार गायब आहेत. त्यांचा शोध सध्या मायणा–कुडतरी पोलीस घेत आहेत. एकूण चारजण कामगार गोल्डन हाऊस चाळीत भाड्याच्या खोलीत राहत होते. त्यातील एकटा पोलिसांना सापडला असून, त्याच्याकडून पोलीस अधिक माहिती घेत आहेत. डोक्यावर दगड व दांडा हाणून सहकारी कामगाराचा खून करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली. हे कामगार एका बांधकामाच्या ठिकाणी काम करीत होते व एकत्र भाड्याच्या खोलीत राहत होते. शनिवारी पगार झाल्यानंतर ते खोलीवर दारू आणून पार्टी करीत होते, अशी माहिती पोलिसांना शेजारी यांच्याकडून मिळाली आहे. दारूच्या नशेत झालेल्या वादातून रात्री उशीरा हे खूनप्रकरण घडल्याचा कयास पोलिसांनी व्यक्त केला आहे. रविवारी खूनाची माहिती मिळाल्यानंतर उपअधीक्षक सिद्धांत शिरोडकर व मायणा–कुडतरी पोलीस स्थानकाचे निरीक्षक अरूण गांवस देसाई यांनी घटनास्थळी जाऊन तपास सुरू केला. याप्रकरणी तपास सुरू असल्याने पोलिसांनी अधिक माहिती देणे टाळले.

# फोंड्यात 'गितरामायण' कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. १३ :** फोंडा तालुक्यातील कला आणि सांस्कृतिक संचालनालय गोवा सरकारच्या राजीव गांधी कलामंदिर येथे 'गीतरामायण' हा कार्यक्रम झाला. आधुनिक वाल्मिकी म्हणून ओळखले जाणारे लोकांचे लाडके कवी ग. दि. माडगूळकर लिखित वाल्मिकी रामायणावर आधारित गाण्यांचा कार्यक्रम असे कार्यक्रमाचे स्वरूप होते.

कला आणि सांस्कृतिक संचालनालय, गोवा सरकारचे संचालक सगुण वेळीप यांनी स्वागत समारोहात संस्थेच्या या उपक्रमाची विशेष दखल घेऊन शिक्षकांना प्रोत्साहन आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन दिले. संस्थेच्या संगीत विभागात शिक्षण घेणारे विद्यार्थी अनुराधा रुईकर, संजिता पेडणेकर, स्वाती पाटकर, डॉ. नंदिनी कारेकर, श्रेया नाईक, शुभदा परब, तनुजा पावसकर, भास्कर गर्दे, स्वराली साने, प्रकाश परब, डॉ. विनोद लाड, दानेश्वरी पाटिल, वैभव नाईक, विश्वनाथ नाईक, सुप्रिया गांवकर, वैष्णवी शेट, करुणा च्यारी यांनी या ठिकाणी आपली गायन कला पेश केली.

कार्यक्रमात संवादिनी साथ दामोदर च्यारी यांनी तर नितीन बर्वे यांनी तबला साथ केली. साईड ऱ्हिदम संयोजन योगेश रायकर यांनी केले आणि सिंथेसायझरची साथ महंत च्यारी यांनी केली. कार्यक्रमाचे सूत्रबद्ध कथारूपी विवेचन आणि निवेदन प्रसिद्ध निवेदिका डॉ. मृण्मयी काळे यांनी केले. संस्थेचे संगीत शिक्षक दामोदर च्यारी, नितीन बर्वे, श्रीकृष्ण सतरकर, योगानंद गावडे, सिद्धी सुर्लकर पिळगावकर, सुभाष परवार यांच्या मार्गदर्शन आणि नियोजनाने सुसूत्रतेने कार्यक्रम झाला. संस्थेच्या सदस्य सचिव स्वाती ढळवी यांच्या नेतृत्वाने आणि खंबीर पाठिंब्याने सुव्यवस्थित नियोजन या कार्यक्रमास लाभले. अनेक मान्यवरांची उपस्थिती आणि प्रेक्षकांचा भरघोस प्रतिसाद हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.


## जाहीर सूचना

तमाम ललोकांना याद्वारे नोटीस देण्यात येते की, माझे **अशील श्रीमती झुलेखा इरफान टीनवाला, कु. आयशा हुमायरा टीनवाला व कु. फातिमा तुझ झहरा इरफान टीनवाला**, सर्व प्रौढ, भारतीय नागरिक, सर्व राहणार 221, टोपीवाला बिल्डींग, ३रा मजला, खोली क्र. 19, एस.व्ही.पी. मार्ग, चामुली, डोंगरी, मुंबई–400009, महाराष्ट्र, की दि. **06.01.2025** रोजीच्या नोटीसखाली त्यांनी एक व्यक्ती श्री. नदीम निझामुद्दीन खान, राहणार व्हिला टी–6, लेक साईड प्रॉपर्टी, घर क्र. 249/7, घरभाट वाडा, लागोवा अझूल हॉटेलशेजारी, बार्देश, गोवा याचे नावे त्यांचे मुखत्यार **श्री. मोहम्मद इरफान गुलाम हुसेन टीनवाला** यांचेद्वारे नागरी निबंधक व उपनिबंधक, बार्देश, गोवा यांचे कार्यालयात अ.क्र. 2023–बीआरझेड–1071 खाली **02.03.2023** रोजी नोंदवलेली मुखत्यार **श्री. मोहम्मद इरफान गुलाम हुसेन टीनवाला** यांचेद्वारे **02.03.2023** रोजीची लीज डीड त्याद्वारे रद्द केले आहे–निलंबित केले आहे. माझे अशील **श्रीमती झुलेखा इरफान टीनवाला, कु. आयशा हुमायरा टीनवाला व कु. फातिमा तुझ झहरा इरफान टीनवाला** हे 1150 चौ.मी. क्षेत्रफळाच्या कांदोळी गाव, बार्देस, गोवा च्या सर्व्हे क्र. 112/1 खाली सर्वेक्षित कांदोळी ग्रामपंचायत, बार्देश, गोवा च्या हद्दीतकांदोळी गाव व पॅरीश, बार्देश–गोवा मध्ये असलेल्या बांगू दांडो किंवा दांडोच्या डांगी दांडो या नावाच्या मालमत्तेसंबंधीमालक आहेत. सदर लीज कराराच्या अटी व शर्तीचे पालन न केल्याने / उल्लंघन केल्याने माझे अशीलांना त्यांच्या मुखत्यारांद्वारे सदर **02.03.2023** रोजीचा लीज करार रद्द व निलंबित करणे भाग पडले. माझे अशील तमाम लोकांनी यापुढे कळवतात की, त्यांच्या वर दिलेल्या मालमत्तेसंबंधी सदर श्री. नदीम निझामुद्दीन खान यांचेबरोबर कोणत्याही व्यवस्थेतील व्यवहार करू नये आणि वर दिलेल्या मालमत्तेसंबंधी केलेला असा कोणताही व्यहार त्यांच्यावर बंधनकाराक राहणार नाही. माझे अशील तमाम लोकांना या जाहीर सुचनेद्वारे पुढे कळवतात की, त्यांनी त्यांच्या स्वतःच्या जोखमीवर सदर मालमत्तेसंबंधी व्यवहार करावा व त्यासाठी ते मुक्त राहतील.

**दि. 11.04.2025**

**सही/–**
**ॲड. अशोक आनंद राव**
एम.ए. एलएलबी.
नोटरी, भारत सरकार
नोंदणी क्र. १६४६९
बी–७, रंगवाला बिल्डींग, डॉ. ई. मोझेस मार्ग, जॅकोब सर्कल,
मुंबई–११. मोबा. : ९८६९९८९८८८, ७९७७९१९८६७

**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR-CUM-SUB REGISTRAR, MORMUGAO, GOA.**
**Shop No. 1 & 2, Karma Empress Building, Ground Floor, Near KTC Bus stand, Vasco da Gama, Goa**
**Telephone No. 9405864461**

No.CR/SR/MOR/99/2025
Dated: 29/01/2025

Office of the Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary Shri. Tushan Gurudas Kunkolienkar, Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary in the said Judicial Division.

In accordance with the section 346(11) of "The Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012", it is hereby made public that by a Deed of Qualification of Heirship dated 29/01/2025, drawn by and before me Shri. Tushan Gurudas Kunkolienkar, Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary, Mormugao at Vasco-da-Gama, at pages 176 to 179 of Notarial Book No. 203 of this office, the following is recorded:

That on 11/06/2005, expired at Goa Medical College, Bambolim Goa, late Roque Joao Antonio Agnelo De Souza, intestate without any will or gift or any other testamentary disposition of the his last wish but leaving behind his widow Smt. Clementina Lenigrada Vas, as his moiety sharer and his children, namely (i) Francis Savio de Souza married to Sucorin Rebello and (ii) Venicia Soccorina D'Souza married to Savio Silverio Fernandes, as his "Sole and universal heirs". And besides them, there being no one else in terms of law of succession still in force in this state of Goa who may prefer or concur along with them to the inheritance left by the said deceased person.

Any person having objection to this deed may file their objection in this office within one month from the date of its publication.

Place: Mormugao-Goa
Dated: 29/01/2025
SEAL
Sd/- **Tushan Gurudas Kunkolienkar**
Special Notary, Mormugao

This Extract is to be published in the official gazette and daily newspapers (in local language and in English) in accordance with the section 346(11) of the Goa Succession Special notaries and Inventory Proceeding Act 2012.

Sd/- **Tushan Gurudas Kunkolienkar**
Special Notary, Mormugao Goa.


# राज्यातील वास्तुविशारदांसाठी 'ऑनलाईन बिल्डिंग प्लॅन अप्रुव्हल'वर कार्यशाळा

▶ गोवा–आयडीसीद्वारे यशस्वी आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १३ :** गोवा औद्योगिक विकास महामंडळाने (गोवा–आयडीसी), ऑनलाइन बिल्डिंग प्लॅन अप्रूव्हल सिस्टम (ओबीपी–एस) या ओपन पोर्टलद्वारे इमारत आराखड्यांचे सुलभ सादरीकरण आणि मान्यता प्रक्रियेची राज्यातील वास्तुविशारदांना ओळख करून देण्याच्या उद्देशाने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. इमारत आराखडा मंजुरी प्रक्रिया सुलभ करणे, अनुपालन वाढवणे आणि ऑनलाईन प्रणालीची कार्यक्षम अंमलबजावणी सुनिश्चित करणे याबाबत माहिती देणे हा या कार्यशाळेचा उद्देश होता.

या कार्यशाळेस राज्यातील ५० हून अधिक वास्तुविशारद सहभागी झाले होते. त्यांना जइझड मॉड्यूलचे तपशीलवार प्रात्यक्षिक दाखवण्यात आले व याद्वारे या सुविधेची कार्यक्षमता आणि त्याचे लाभ अधोरेखित करण्यात आले. या संवादात्मक कार्यशाळेत आर्किटेक्ट्सना या प्रणालीचा वापर कसा करता येतो व त्याद्वारे विविध अनुपालन आवश्यकतांची पूर्तता कशी करता येते याबाबत चर्चा, प्रशोत्तरे आणि प्रत्यक्ष प्रणालीचा वापर करण्याबाबतचे प्रात्यक्षिक आदींच्या माध्यमातून सविस्तर माहिती देण्यात आली.

गोवा–आयडीसीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. प्रविमल अभिषेक यांनी औद्योगिक पायाभूत सुविधा विकासात डिजिटल परिवर्तन आणि कार्यक्षमतेसाठी महामंडळाने राबवलेले प्रयत्न आणि वचनबद्धता यावर भर दिला. पारदर्शकता वाढवण्याबरोबरच ऑनलाइन बिल्डिंग प्लॅन अप्रूव्हल सिस्टम (ओबीपी–एस) द्वारे उद्योगांसाठी बांधकाम मंजुरी कशा प्रकारे अधिक सुलभ व गतिमान झाली आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. जेव्हा मी दोन वर्षांपूर्वी या कामाची जबाबदारी घेतली, तेव्हा मला औद्योगिक सुविधा बांधकाम मंजुरी प्रक्रियेत स्पष्टतेचा अभाव आढळला. बंद दाराआड बैठका घेतल्या जात होत्या, फायलींवर चर्चा करण्यासाठी कोणताही साचेबद्ध प्रक्रिया नव्हती आणि अर्जदारांना त्यांच्या योजना का मंजूर केल्या जात नाहीत याबद्दल अनेकदा अंधारात सोडले जात असे अशी परिस्थिती अनुभवास येत होती, असे ते म्हणाले.

या आव्हानांना तोंड देण्यासाठी, गोवा–आयडीसीने सुरुवातीला मूलभूत सुधारणा लागू केल्या. जसे की, सर्व फाइल मंजूर होईपर्यंत कार्यप्रक्रिय चालू ठेवणे, संवाद वाढवण्यासाठी वास्तुविशारद, अभियंते आणि उद्योग प्रतिनिधींना बैठकांमध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित करणे आदी प्रयत्न राबवण्यात आले. या उपाययोजनांमुळे मान्यता प्रक्रियेत सुधारणा व गती आली. आता, ओबीपीएएस प्रणालीमुळे ही सारी प्रक्रिया ऑनलाइन झाली आहे. श्री. अभिषेक प्रविमल यांनी स्पष्ट केले की, उद्योग आता एकाच अर्जाद्वारे तांत्रिक मंजुरी आणि बांधकाम परवाने दोन्हीसाठी अर्ज करू शकतात.

या प्रणालीमध्ये आर्किटेक्टसाठी आपला प्रस्ताव सादर करण्यापूर्वी नियमांचे पालन पडताळण्यासाठी, चुका कमी करण्यासाठी आणि वेळेची बचत करण्यासाठी एक सुलभ पर्यायही या प्रणालीमध्ये उपलब्ध करण्यात आला आहे, असे त्यांनी पुढे स्पष्ट केले. हा डिजिटल प्लॅटफॉर्म बेंगळुरूमधील ईगव्ह फाउंडेशनने आपल्या विश्वासार्ह प्रणालीच्या आधार विकसित केला आहे. ही संस्था भारतातील २,५०० हून अधिक शहरे आणि जगभरातील १५ हून अधिक देशांमध्ये कार्यरत आहे. त्यामुळे आम्ही नव्याने चक्राचा शोध घेत बसलो नाही. त्याऐवजी, आम्ही एका स्थापित, विश्वासार्ह प्रणालीचा वापर केला आणि आमच्या गरजांनुसार या प्रणालीचा विकास केला, अशी भूमिका त्यांनी नमूद केली.

पोर्टलचे थेट प्रात्यक्षिक सादर करत या कार्यशाळेत सहभागींचा पहिल्या अनुभवाबाबतचा अभिप्राय मांडण्यास प्रोत्साहित करण्यात आले. तसेच कार्यशाळेचा एक भाग म्हणून, गोवा–आयडीसीने तयार केलेल्या वास्तुरचना संहिता (आर्किटेक्ट मॅन्युअल) आढावा घेण्यात आला. या संहितेमध्ये इमारत आराखडा सादर करण्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे आणि आवश्यकता तसेच प्रक्रिया याबाबत वास्तुविशारदांना सखोल माहिती देण्यात आली. तसेच या सुविधेबाबत अधिक स्पष्टता आणणे आणि या सुविधेची वापरयोग्यता वाढवणे याबाबत या संहितेबाबतचे अभिप्राय, सूचना सहभागी प्रतिनिधींनी सादर केल्या. या संवादात्मक कार्यशाळेतून गोवा–आयडीसीच्या नियामक चौकटीला वास्तुविशारदांच्या व्यावहारिक गरजांशी जुळवून घेण्यास मदत झाली, ज्यामुळे अधिक कार्यक्षम आणि वास्तुविशारद–अनुकूल मंजुरी प्रक्रिया विकसित करण्यास लाभ होणार आहे.

कार्यशाळेत वास्तुविशारद आणि उद्योग प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग दिसून आला.